Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 23 March 2024

Time: 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: २३ मार्च २०२४ सकाळी ७.१० मि.**

********

***ठळक बातम्या***

- **इस्रोच्या 'आर. एल. व्ही. पुष्पक' उपग्रह प्रक्षेपक वाहनाचं यशस्वी भू अवतरण**
- **पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भूतानचा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान**
- **आपण कोणतीही निवडणूक लढवणार नसल्याचा ज्येष्ठ नेते शरद पवार यांचा पुनरुच्चार**
- **छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १८ महसूल मंडळात गंभीर स्वरुपाचा दुष्काळ जाहीर**

**आणि**

- **आयपीएल क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ;रॉयज चॅलेंजर्स बंगळुरूचा पराभव करत चेन्नई सुपर किंग्जची विजयी सलामी**

**सविस्तर बातम्या**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्रोनं काल, 'आर. एल. व्ही. पुष्पक' हे पुनर्वापर करण्याजोगं उपग्रह प्रक्षेपक वाहन यशस्वीपणे जमिनीवर उतरवलं. कर्नाटकातल्या चित्रदुर्ग चाचणी केंद्रावर ही मोहीम यशस्वीरित्या पार पडली. संपूर्णपणे स्वयंचलित पद्धतीनं अंतराळ यानाचं संचालन, अवतरण आणि इंधन व्यवस्थापन केल्याबद्दल, इस्रोचे अध्यक्ष सोमनाथ यांनी या अभियानाच्या चमूचं

अभिनंदन केलं. माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी इस्रोच्या वैज्ञानिकांचं अभिनंदन केलं आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भूतानचा सर्वोच्च नागरी सन्मान, द ऑर्डर ऑफ द ड्रूक ग्यालपो देऊन सन्मानित करण्यात आलं. भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्येल वांगचुक यांनी थिंपू इथे झालेल्या समारंभात, पंतप्रधान मोदी यांना हा पुरस्कार प्रदान केला. हा पुरस्कार म्हणजे भारत देशाचा आणि भारतातल्या जनतेचा गौरव असल्याचं सांगत, भारतीय जनतेच्या वतीनं हा पुरस्कार स्वीकारत असल्याचं, पंतप्रधानांनी यावेळी नमूद केलं.

****

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना त्यांच्या कर्मांमुळेच अटक झाल्याची परखड प्रतिक्रिया, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांनी दिली आहे. ते काल अहमदनगर इथं पत्रकारांशी बोलत होते. एकेकाळी आपल्यासोबत काम करणारे आणि मद्याच्या विरोधात असलेले केजरीवाल आता मद्य धोरणं तयार करत असल्याचं पाहून त्रास झाल्याची भावनाही हजारे यांनी व्यक्त केली.

कथित मद्यधोरण घोटाळा प्रकरणात अटक झालेले केजरीवाल यांना न्यायालयानं २८ मार्चपर्यंत, सक्तवसुली संचालनालय-ईडी कोठडी सुनावली आहे.

दरम्यान, केजरीवाल यांच्या कारवाईच्या विरोधात काल आम आदमी पक्षाचे नेते आणि कार्यकर्त्यांनी दिल्ली आणि इतरत्र निषेध आंदोलन केलं.

जालना इथंही आप कार्यकर्त्यांनी निषेध आंदोलन केलं. आम आदमी पक्षाचे जिल्हाध्यक्ष संजोग हिवाळे यांच्यासह अनेक कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी झाले.

छत्रपती संभाजीनगर इथंही पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शनं केली.

****

लोकसभा निवडणुकीसाठी, भारतीय जनता पक्षाने काल १५ उमेदवारांची चौथी यादी जाहीर केली. त्यात तामिळनाडू आणि पुदुच्चेरीमधल्या लोकसभा मतदारसंघांमधल्या उमेदवारांचा समावेश आहे. दरम्यान, महायुतीच्या अनेक नेत्यांनी काल मुंबईत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर या शासकीय निवासस्थानी चर्चा केली. निवडणूक संचालन समितीची बैठकही इथं पार पडली. भाजपने राज्यातले २०

उमेदवार जाहीर केले असून, आता उर्वरित २८ जागांसाठी महायुतीमध्ये जागावाटप होणं बाकी आहे.

****

आपण कोणतीही निवडणूक लढवणार नसल्याचा पुनरुच्चार, ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केला आहे. ते काल बारामती इथं पत्रकारांशी बोलत होते. महाविकास आघाडीतल्या जागा वाटपावर चर्चा सुरू असल्याचं त्यांनी सांगितलं. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अटकेच्या कारवाईवर पवार यांनी यावेळी टीका केली.

****

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची जाहीरनामा समिती स्थापन करण्यात आली आहे. २० सदस्यांच्या या समितीच्या अध्यक्षपदी सहकार मंत्री दिलीप वळसे-पाटील यांची निवड करण्यात आली असून, समिती सदस्यांमध्ये धनंजय मुंडे, अनिल पाटील, आदिती तटकरे, नरहरी झिरवळ, आदी मान्यवरांचा समावेश आहे.

****

**या बातम्या आकाशवाणीच्या छत्रपती संभाजीनगर केंद्रावरून देत आहोत**

****

जागतिक जल दिन काल सर्वत्र पाळण्यात आला. शांततेसाठी पाणी ही यंदाच्या जल दिनाची संकल्पना आहे.

छत्रपती संभाजीनगर इथं काल सकाळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वतीने जलसाक्षरता फेरी काढण्यात आली. या फेरीमध्ये नागरिक तसंच सामाजिक संस्था मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

धाराशीव इथं जीवन प्राधिकरणाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जल प्रतिज्ञा घेतली. जलजागृतीसाठी शहरातून जलदिंडी काढण्यात आली. यावेळी दैनंदिन जीवनातली पाणी वापरण्याची पद्धत, काटकसर आणि स्वच्छता या विषयावर व्याख्यान झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या छत्रपती संभाजीनगर तालुक्यात १४ तर सोयगाव तालुक्यात चार, अशा १८ महसूल मंडळात गंभीर स्वरुपाचा दुष्काळ जाहीर करण्यात आला असून, अन्य तालुक्यांमधल्या ५० महसूल मंडळांमध्ये दुष्काळ

सदृष परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. अशा गावांमध्ये दुष्काळी उपाययोजना तसंच सवलती लागू करण्याचे आदेश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले आहेत.

****

परभणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनय मून यांनी काल जिल्ह्यातल्या पाणी टंचाईबाबत आढावा बैठक घेतली. पाणी टंचाई कृती आराखड्यातल्या प्रस्तावित उपाययोजनांचा यावेळी आढावा घेण्यात आला. सध्या जिल्ह्यामध्ये दहा खाजगी विहिरी अधिग्रहित करून त्यातून पाणीपुरवठा सुरू आहे.

****

धाराशिव जिल्ह्यात सध्या बारा गावात २१ टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. तर एकशे चाळीस गावात २७० विंधन विहिरींच्या अधिग्रहणातून पाणी पुरवलं जात आहे.

****

इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेला कालपासून प्रारंभ झाला. चेन्नईच्या एम. ए चिदंबरम क्रीडा संकुलावर काल झालेल्या सलामीच्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जनं रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा सहा गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करत बंगळुरुच्या संघानं दिलेलं १७४ धावांचं आव्हान चेन्नईनं १९व्या षटकातच पूर्ण केलं.

****

स्विस खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष एकेरीत भारताच्या किदांबी श्रीकांतनं उपान्त्य फेरीत प्रवेश केला आहे. काल झालेल्या सामन्यात त्याने तैवानच्या खेळाडुचा २१ – १०, २१ – १४ असा पराभव केला. अन्य सामन्यांमध्ये प्रियांशू राजावत आणि किरण जॉर्जला पराभवाचा सामना करावा लागला.

****

लोकसभा निवडणुकीसाठी बीड जिल्ह्यातून उमेदवारी जाहीर झालेल्या भाजपाच्या उमेदवार पंकजा मुंडे यांचं काल जिल्ह्यात उत्साहात स्वागत करण्यात आलं. धामणगाव इथं त्यांनी प्रचारसभा घेतली. आपण कोणत्याही जातीच्या मुद्द्यावर राजकारण न करता विकासाचं राजकारण केलं, त्यामुळेच आपल्याला उमेदवारी मिळाली, असं मुंडे यांनी सांगितलं आहे.

****

मतदानामुळेच लोकशाही सशक्त होणार असल्याचं बीडच्या जिल्हाधिकारी दीपा मुधोळ- मुंडे यांनी म्हटलं आहे. बीड जिल्ह्यात चौथ्या टप्प्यात १३ मे ला मतदान होणार असून, सर्व मतदारांनी मतदान करण्याचं आवाहन त्यांनी केलं आहे.

****

लोकसभा निवडणुकीदरम्यान दिव्यांगांना कोणता त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी, असे निर्देश नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिले आहेत. दिव्यांगांसाठी मतदान केंद्रावर सुविधा पुरविणाऱ्या सनियंत्रण समितीच्या बैठकीत ते बोलत होते. दिव्यांगांना मदत करण्यासाठी स्वयंसेवकांची नेमणूक करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

दरम्यान, जिल्ह्यात निवडणुका शांततामय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा पोलीस दलाच्या मदतीला निमलष्करी दलाच्या तुकड्याही तैनात असणार आहेत. या तुकड्या नांदेड शहरात दाखल झाल्याची माहिती जिल्हाधिकारी राऊत यांनी दिली.

****

हिंगोलीमध्ये लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगानं राजकीय पक्षांसाठी एक खिडकी योजना कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. यामुळे राजकीय पक्ष, उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधी यांना प्रचारविषयक विविध परवानग्या प्राप्त करणं सोयीचं होणार आहे. हेलिकॉप्टर वापराची परवानगी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत देण्यात येणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेनं २०१५ मध्ये स्थापन केलेल्या दहा सफाई कामगारांच्या 'स्वच्छतारत्न बचत गटानं' केलेल्या शहर सफाईच्या प्रसिद्ध अभिनेते अमिताभ बच्चन यांनी दखल घेतली आहे. बच्चन यांनी या गटाचा गौरव करत, त्यांच्या कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी १० स्वच्छता यंत्रसामग्री वाहनांसह भेट दिली आहे.

****

हिंगोली जिल्ह्यातल्या सगळ्या ग्रामपंचायती आणि नगर परिषद हद्दीत सगळ्या यात्रा आणि धार्मिक स्थळी पशुबळी देण्यास प्रतिबंध करण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी दिले आहेत. अशा पशुहत्या थांबवण्यासाठी

ग्रामस्थ, ग्रामपंचायत सदस्य, यात्रा समिती सदस्य, देवस्थान विश्वस्त आणि समविचारी संस्था यांनी प्रयत्न करावेत, असंही या आदेशात म्हटलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या स्मार्ट सिटीचा सहायक प्रकल्प व्यवस्थापक ऋषिकेश इंगळे याला ४० हजार रुपयांची लाच घेताना काल अटक करण्यात आली. स्मार्ट सिटी बस स्वच्छतेच्या कंत्राटदाराचं चार महिन्यांचं सव्वा सात लाखाचं देयक काढण्यासाठी त्यानं ही लाच मागितली होती.

****

परभणी शहरात सार्वजनिक ठिकाणी प्रतिबंधित तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांचं सेवन करणाऱ्या २२ पानटपरी धारकांवर कारवाई करत दंड वसूल करण्यात आला. जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली बसस्थानक परिसरामध्ये ही कारवाई करण्यात आली.

****

जळगाव इथं एमडी ड्रग्ज विक्रीसाठी आलेला तरूण आणि ड्रग्जचा पुरवठा करणाऱ्या दोन जणांना शहर पोलिसांनी गुरुवारी रात्री अटक केली. त्यांच्याकडून १२२ ग्रॅम वजनाचं नऊ लाख ७७ हजार ७६० रुपये किंमतीचे एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आलं.

****

मुंबई गोरखपूर गोदान एक्सप्रेसला काल दुपारी नाशिकरोड रेल्वे स्थानकावर आग लागली. ही गाडी स्थानकातून मार्गस्थ होताच काही वेळातच शेवटच्या डब्यातल्या पार्सलच्या कंपार्टमेंटला आग लागल्याचं निदर्शनास आलं. सुदैवाने रेल्वे त्वरित थांबवून प्रवासी बाहेर पडल्यामुळे यात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

****

हिंगोली जिल्ह्यात कळमनुरी तालुक्यातल्या रेडगाव इथल्या पुलावरुन केळी घेऊन जाणारा ट्रक कोसळून झालेल्या अपघातात चालकाचा मृत्यू झाला. काल संध्याकाळी हा अपघात झाला.

****